**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८१६/ २०२३**
**निशाणी क्रमांकः– १३ खाली**
**बेबीबाई पाटील व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नावः– ऋतुराज नरेश पाटील

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. धनराज तोकडे यांचे मार्फत सुरू**

**१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या वडिलांच्या मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत प्रकरणात दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.२०** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावावर असलेल्या मोटरसायकल क्र. एमएच०६एवाय६८४७ च्या रजिस्ट्रेशन सर्टीफिकेटची झेरॉक्स प्रत व मारूती सुजुकी कार क्र.एमएच०६एडब्लयु०२२३ च्या रजिस्ट्रेशन सर्टीफिकेटची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट सोबत आणले आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.२३ व २४** देण्यात येत आहे. अर्जदार क्र. १ व ३ ते ५ यांनी माझ्या नावे करून दिलेले मुळ कुलमुखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. २५** देण्यात येत आहे.

२. दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.०९/०१/२०२४ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.09 15:46:45 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**

**दिनांकः– ०९/०४/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**